# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,

एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

ई-मेल - prog.mlwb-mh@gov.in

दूरध्वनी क्रमांक: ४३२२६८००/४३२२६८१६/४३२२६८१७


जा.क्र.: मका/कार्यक्रम/२०१७-१८/ 325 दिनांक: 26/०४/२०१७

परिपत्रक

**विषय:- इंग्रजीसह विदेशी भाषेचे संभाषण प्रशिक्षण वर्गाबाबत-२०१७-१८**

संदर्भ :- १) समितीची दिनांक २५.०९.२०१३ रोजीच्या बैठकीतील निर्णय
२) मका/कार्यक्रम/२०१३-१४/९३८ दि.२७.०९.२०१३
३) मका/कार्यक्रम/२०१३-१४/९४९ दि.०१.१०.२०१३
४) शासनाचे मान्यतापत्रक क्र.मकाक-०९-२०१३/ प्र. क्र. ३३७/ काम-१० दिनांक ३०.१०.२०१३
५) मका/काशा/२०१३-१४/१०५३ दि. ३०.१०.२०१३
६) मका/काशा/२०१६-१७/४२८ दि.३०.०५.२०१६

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत कामगार व कामगार कुटुंबियासाठी इंग्रजीसह विदेशी भाषेचे संभाषण वर्ग सुरु करण्यास संदर्भिय पत्र क्र.४ नुसार शासनाने मान्यता व मंजूरी दिलेली आहे.त्यानुसार संदर्भिय ५ व ६ नुसार संबंधित संस्था चालकांना प्रतिबॅच प्रतिमहा मानधनावर विभागावर नेमणूक करुन माहे ऑक्टोंबर २०१३ पासून इंग्रजीसह विदेशी भाषेचे संभाषण प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत.

इंग्रजीसह विदेशी भाषेचे संभाषण प्रशिक्षण वर्गाच्या सर्वसाधारण नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.

१. अर्जदाराने मंडळाच्या जवळच्या केंद्रामध्ये विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा.
२. अर्जदाराला केंद्राचे सर्वसाधारण सभासद नोंदविणे आवश्यक आहे.
३. इंग्रजीसह विदेशी भाषेचे संभाषण प्रशिक्षणासाठी तिन महिन्याच्या कोर्ससाठी प्रतिमाह रु.१००/- प्रमाणे एकत्रित रु.३००/- व ६ महिन्याच्या कोर्ससाठी एकत्रित रु.६००/- शुल्क आकारले जाईल.
४. सदर प्रशिक्षण वर्ग आठवड्यातून सुट्टीचे दिवस वगळून ३ दिवस २ तास राहील.
५. सदर प्रशिक्षण वर्गात सभासदांनी नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे.
६. अर्जदाराला कामगार असल्याचा पुरावा म्हणून मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरल्याची माहे जून/डिसेंबर ची वेतन पावती/आस्थापनाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.कामगार कुटुंबिय असल्यास पालकाची वेतन पावती/आस्थापनाचा दाखला व रेशन कार्ड सोबत जोडणे आवश्यक आहे.
७. अर्जासोबत आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner